# बालदोस्तांनी साकारले अनेकविध बाप्पा

## माय फ्रेंड गणेशा स्पर्धा

सकाळ वृत्तसेवा

रत्नागिरी, ता. १६ : शाडूच्या मातीच्या गोळ्यातून गणपती साकारण्यात बच्चे कंपनी दंग होती. गणेशाची अनेकविध रूपे साकारून बालदोस्तांनी आपल्या कल्पनाशक्तीचे दर्शन घडवले. बाहुबली, शेषनागावर बसलेला गणेश, 'एक देश एक कर' जीएसटीचे महत्त्व सांगणारा गणेश, मोरावर बसलेला गणपती असे अनेक प्रकारचे बालगणपती पाहायला मिळाले. निमित्त होते आसमंत बेनोव्हलन्स फाउंडेशन व आर्ट सर्कल आयोजित माय फ्रेंड गणेशा स्पर्धेचे.

येथील पटवर्धन हायस्कूलमध्ये सलग सहाव्या वर्षी स्पर्धा रंगली. यात ५७ स्पर्धकांनी भाग घेतला. पहिल्या गटात रा. भा. शिर्के प्रशालेने तीनही क्रमांक पटकावले. प्रथम सूरज रामाणे, द्वितीय स्वरूप कदम आणि तृतीय क्रमांक स्वराज कदमने मिळवला. दुसऱ्या गटात पटवर्धन हायस्कूलच्या ओंकार पाटणकर व चिन्मय वैद्य यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व फणसोपच्या लक्ष्मीकेशव विद्यामंदिरच्या अक्षय पावसकर याने तृतीय क्रमांक मिळवला. तिसऱ्या गटात धाऊलवल्लीच्या गोखले विद्यालयातील अथर्व बाणे, फाटक हायस्कूलच्या आर्यन भारती व सूरज मांचकर यांनी अनुक्रमे द्वितीय, तृतीय क्रमांक मिळवला. जीएसटीचे महत्त्व सांगणारा गणेश बनवल्याबद्दल आर्यन सावंत याला विशेष बक्षीस देण्यात आले.



रत्नागिरी : आसमंत फाउंडेशन व आर्ट सर्कल आयोजित स्पर्धेतील विजेत्यांसह डावीकडून सचिन देसाई, रूपाली जोशी, श्रीकांत ढालकर, अभिजित नांदगावकर, दादा वणजू, नंदकुमार पटवर्धन. (मकरंद पटवर्धन : सकाळ छायाचित्रसेवा)

परीक्षक म्हणून मूर्तिकार श्रीकांत ढालकर व कलाशिक्षक रूपाली जोशी यांनी काम पाहिले. बक्षीस वितरणाला आसमंतचे प्रमुख नंदकुमार पटवर्धन, परीक्षक, गायक अभिजित नांदगावकर, सचिन देसाई, सुनील वणजू आदी उपस्थित होते.

पुढील वर्षी माय फ्रेंड गणेशा स्पर्धेपूर्वी प्रत्येक शाळेच्या सहकार्याने गणेशमूर्ती साकारण्याची कार्यशाळा आर्ट सर्कलच्या माध्यमातून घेण्याचा मानस दादा वणजू यांनी व्यक्त केला.